संफौ.ख.क्र. ५५१/२०१७
सरकार वि. रामदास आणि १
नि.क्र. १२

सरकारतर्फे साक्षदारर क्रमांक २ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो कि
नाव – राजेश दसाराम चौधरी,
वय – ४० वर्ष, व्यवसाय – शेतमजूरी,
राह. – ढोलमारा, ता. मौदा, जिल्हा नागपुर.

<u>सरतपास शपथेवर सरकारतर्फे शासकिय अभियोक्ता श्री.बी.एम.भगत द्वारा</u>

**१.** मी आरोपीस व फिर्यादीस ओळखतो. दि.११.०९.२०१७ रोजी पोलीसांनी पंचनामा करणेकामी मला फिर्यादीच्या घरी बोलावून घेतले होते. पोलीसांनी माझ्या समक्ष पंचनामा तयार केला व त्यावर माझी सही घेतली. आता मला दि. ११.०९.१७ चा घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. घटनास्थळ पंचनाम्यास **नि.क्र.१३** देण्यात आहे.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीतर्फे वकिल श्री एम.एच. राहांगडाले यांच्या द्वारे –**

२. मी ढोलमारा येथे राहतो. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीस आले तेव्हा पानठेल्यावर होतो. हे म्हणणे खरे आहे की, सदर ठिकाणी पोलीस आले व ते मला म्हणाले की, 'एका कागदावर सही करा काही होत नाही.' हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला त्यातील मजकूर वाचून दाखवला मग त्यावर माझी सही घेण्यात आली असा प्रकार घडलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांच्या सांगण्यानुसार मी सही केली आहे.

**उलटतपास पूर्ण.**

फेरतपास नाही.
श्रवणोत्तर स्वीकृत.
मौदा.
दिनांक २५.०८.२०२५

समक्ष
**स्वाक्षरी/–**
(एल.एम. पठाण)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मौदा